# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
Email ID : education.nmc@gmail.com


जा.क्र. शि.वि./33/4/2014
दि. 27/10/2014

प्रति,

मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
मनपा नागपूर

**विषय :– प्राथ. व माध्य. शाळांसाठी आवश्यक असणाऱ्या अभ्यासपयोगी व मॉडेल्सची मागणी नोंदविण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये सुचित करण्यात येते की, शैक्षणिक तक्त्यांद्वारे वर्गामध्ये अध्यापन करून विद्यार्थ्यांना अभ्यासामध्ये रूची निर्माण करण्यास्तव शाळांमध्ये वर्गनिहाय, विषयनिहाय, शैक्षणिक तक्त्ये व मॉडेल्सचा पुरवठा करणे आवश्यक आहे. जेणेकरून शैक्षणिक साधनांचा वापर करून शिक्षक वर्ग चांगल्याप्रकारे अध्ययन कार्य करून विद्यार्थ्यांचा बौध्दीक विकाससुद्धा साध्य होवू शकेल. परंतु अशाप्रकारचे प्रिंटेड, रंगीत व अभ्यासक्रम तयार केलेले तक्ते यापूर्वी देखील शाळांमध्ये उपलब्ध असू शकतात. याचा विचार करून प्रस्तुत शैक्षणिक तक्ते व मॉडेल्सची शाळानिहाय अपेक्षित संख्या माहित होणे आवश्यक आहे. यास्तव खाली दिलेल्या तक्त्यात माहिती भरून पाच दिवसाचे आंत आपले झोनचे शाळा निरीक्षक यांचेकडे सादर करावे. माहिती सादर न केल्यास किंवा विलंबाने सादर केल्यामुळे मागणी नोंदविली गेली नाही तर आपणांस शैक्षणिक तक्त्यांचा पुरवठा करण्यात येणार नाही. तसेच शाळेत शैक्षणिक साहित्य व मॉडेल्स उपलब्ध असल्यावरही अवास्तव/दुबार मागणी केल्यास याचीही नोंद घेतली जाईल. यामुळे आवश्यकतेप्रमाणेच मागणीची नोंद करावी.

| अ.क्र | शाळेचे नांव | इयत्ता | आवश्यक असणारे शैक्षणिक तक्ते (विषय निहाय) |
|---|---|---|---|
| | | | |

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर